महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८३ /२०२३ दि. २४/०६/२०२३

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी**, भिवंडी वाहतुक उप विभाग हद्दीत दि.२९/०६/२०२३ रोजी किंवा एक दिवस मागे पुढे (चंद्र दर्शनानुसार) मुस्लीम बांधवांचा **"बकरी ईद"** हा सण साजरा होणार आहे. सदर दिवशी मुस्लिम बांधव मोठया प्रमाणात पहाटे पासुनच नमाज पठण करणेसाठी वेगवेगळया मशिदी व इदगाह मध्ये मोठया संखेने जमा होतात. सदर वेळी भिवंडी शहरातील वाहतुक सुरळित व सुरक्षित रहावी, वाहतुकीची कोंडी होऊ नये, याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी, मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) मुंबई/ठाणे/मानकोली कडुन जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणा–या जड/अवजड वाहनांना अंजुरफाटा या ठिकाणी **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने वसई रोड मार्गाने कारीवली जकातनाका व विटभटटी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई ठाणे कडुन जुना ठाणे आग्रा रोडने अंजुरफाटया कडुन भिवंडी शहरात येणा–या टि.एम.टी./एस.टी., सर्व प्रकारच्या बसेस व हलक्या वाहनांना नारपोली पो.स्टे.येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** टी.एम.टी./एस.टी.मधील प्रवाशी सदर ठिकाणी उतरतील व तेथुनच प्रवाशी घेवून परत जातील आणि हलकी वाहने ही देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) रांजनोली नाका कडुन भिवंडी शहरात येणा–या एस.टी.,के.डी.एम.टी.बसेस,जड अवजड वाहने, कार,रिक्षा,दुचाकी मध्यम व हलकी वाहनांना रांजनोली नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची एस.टी.,के.डी.एम.टी.बसेस,रिक्षा रांजनोली नाका येथे प्रवाशी उतरवतील व तेथुनच प्रवाशी भरुन इच्छित स्थळी जातील तसेच जड–अवजड,मध्यम व हलकी वाहने रांजनोली नाका येथुनच वळसा घेवून मुंबई नाशिक बायपास हायवे वरील मानकोली नाका येथुन अंजुरफाटा किंवा ओवळी खिंड येथुन ओवळी गांव,ताडाळी जकातनाका,पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना पारोळफाटा (नदीनाका) येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने हि अंबाडी नाका येथुन राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडीकडे येणाऱ्या सर्व हलक्या वाहनांना मेट्रो हॉटेल येथे**'प्रवेश बंद'**करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची हलकी वाहने मेट्रो हॉटेल येथे उजवीकडे वळुन संगमपाडा रोड–अजयनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस.टी.बसेससह धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची सर्व प्रकारची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे वळण घेवून पाईपलाईन मार्गे वाडयाकडे व पुढे इच्छित स्थळी जातील.

ब) तसेच एस.टी.बसेस आपले प्रवाशी चाविंद्रा जकातनाका या ठिकाणी उतरवतील व तेथुनच प्रवाशी घेवून बस वळवुन इच्छित स्थळी जातील.

CamScanner

**प्रवेश बंद –** ७) छत्रपती शिवाजी महाराज चौक कडुन वंजारपाटी नाका मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने अजयनगर–संगमपाडा–मेट्रो हॉटेल डावीकडे वळुन वंजारपाटी ब्रिज वरुन इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही बकरी–ईद सणाचे दिवशी म्हणजेच दिनांक २९/०६/२०२३ रोजी किंवा एक दिवस मागे पुढे **(चंद्र दर्शनाप्रमाणे)** सकाळी ०६.०० ते १०.०० वाजे पावतो नमाज पठणाचा कार्यक्रम संपे पर्यंते अंमलात राहिल.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहन व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, निजापुरशहर महानगरपालिका,भिवंडी,/बृहन्मुंबई
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.
पोलीस अधिक्षक,ठाणे ग्रामिण.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी/ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,भिवंडी/ठाणे/कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी,/ठाणे.

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी,नारपोली,कोनगांव वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner